**L. C. BILL No. VII OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR THE CONSTITUTION OF THE MAHARASHTRA STATE COMMISSION FOR SCHEDULED TRIBES WITH A VIEW TO PROTECT AND SAFEGUARD THE INTERESTS OF THE SCHEDULED TRIBES IN THE STATE OF MAHARASHTRA; AND TO RECOMMEND REMEDIAL MEASURES FOR THEIR WELFARE AND DEVELOPMENT AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७.**

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींच्या हिताचे संरक्षण व रक्षण करण्याच्या; आणि त्यांचे कल्याण व विकास करण्यासाठी सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींच्या हिताचे संरक्षण व रक्षण करण्याच्या; आणि त्यांचे कल्याण व विकास करण्यासाठी सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास, अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) "आयोग" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेला, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग, असा आहे;

(ख) "सदस्य" याचा अर्थ, या आयोगाचा सदस्य, असा आहे, आणि त्यात, अध्यक्ष व सदस्य-सचिव यांचा समावेश होतो;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(घ) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये आयोगाने केलेले विनियम, असा आहे;

(ङ) "अनुसूचित जमाती" या संज्ञेत, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३६६ च्या खंड (२५) मध्ये त्यांना जो अर्थ नेमून दिलेला आहे तोच अर्थ असेल;

(च) "राज्य शासन" किंवा "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

## प्रकरण दोन

### महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग घटित करणे.

**३.** (१) राज्य शासन, या अधिनियमान्वये आयोगास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यास सोपविलेली कार्ये करण्यासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग म्हणून संबोधण्यात यावयाचा एक निकाय, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, घटित करील.

(२) आयोग, राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित करावयाच्या पुढील सदस्यांचा मिळून बनलेला असेलः-

(क) अध्यक्ष, जी, अनुसूचित जमातींतील विख्यात व्यक्ती असेल;

(ख) उच्च न्यायालयातील किंवा सत्र न्यायालयातील, कामकाजाचा किमान सात वर्षांचा, विशेषतः, नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ या मधील अनुभव असलेल्या अधिवक्त्यांमधून अथवा सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश किंवा त्याच्याशी समकक्ष पदावरील व्यक्तींमधून, एक सदस्य;

१९५५ चा २२.

१९८९ चा ३३.

(ग) राज्य शासनाच्या सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले पद धारण करीत असलेल्या, राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून, एक सदस्य;

(घ) समाजकार्याच्या क्षेत्रातील किंवा अनुसूचित जमातींच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संघटनेमधील किंवा शासकीय संघटनेमधील कामाचा अनुभव असलेल्या विख्यात व्यक्तींमधून, एक सदस्य;

(ङ) भारतीय पोलीस सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी असलेल्या आणि सामाजिक न्यायाची प्रकरणे हाताळण्याच्या कामामधील पुरेसा अनुभव असलेल्या व्यक्तींमधून, एक सदस्यः

परंतु, वरील सदस्यांपैकी एक सदस्य, महिला असेलः

परंतु आणखी असे की, नामनिर्देशित करावयाचे सर्व सदस्य हे, अनुसूचित जमातींमधील असतील;

(च) उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांमधून, शासनाने प्रतिनियुक्त करावयाचा सदस्य-सचिव. तो, आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो, आयोगाच्या अधिकारांचा वापर करील आणि कार्ये पार पाडील.

अध्यक्षाचा व सदस्यांचा पदावधी व सेवाशर्ती.

**४.** (१) प्रत्येक सदस्य, त्याने पद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या पदावधीसाठी पद धारण करीलः

परंतु, अध्यक्षाची किंवा सदस्याची, दोनपेक्षा अधिक पदावधींसाठी नियुक्ती करण्यात येणार नाही.

(२) सदस्यास, राज्य शासनाला उद्देशून, त्याच्या सहीनिशी, कोणत्याही वेळी, पदाचा लेखी राजीनामा देता येईल.

(३) राज्य शासन, जर एखादी व्यक्ती,-

(क) अविमुक्त नादार झाली असेल;

(ख) राज्य शासनाच्या मते, ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव होतो अशा अपराधासाठी दोषसिद्ध ठरली असेल आणि तिला कारावासाची शिक्षा झाली असेल;

(ग) विकल मनाची असेल आणि एखाद्या सक्षम न्यायालयाकडून ती तशी असल्याचे घोषित केले असेल;

(घ) काम करण्यास नकार देत असेल किंवा काम करण्यास असमर्थ ठरली असेल;

(ङ) आयोगाकडून अनुपस्थित राहण्याची परवानगी न घेता, आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिली असेल; किंवा

(च) राज्य शासनाच्या मते, त्या व्यक्तीने त्या पदावर असण्याचे चालू राहणे हे, अनुसूचित जमातींच्या हिताच्या किंवा जनहिताच्या दृष्टीने अहितकारक ठरेल अशा रीतीने, तिने अध्यक्ष किंवा सदस्य पदाचा गैरवापर केला असेल अथवा ती, असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पदावर असण्याचे चालू राहण्यास अन्यथा अपात्र किंवा अयोग्य असेल,

तर, अशा व्यक्तीला अध्यक्ष किंवा सदस्य पदावरून दूर करीलः

परंतु, अशा पदाधिकाऱ्याला, त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, या खंडान्वये पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(४) पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये किंवा अन्यथा रिक्त झालेले पद, राज्य शासनाकडून, शक्य तितक्या लवकर, नव्याने नामनिर्देशन करून भरण्यात येईल; आणि अशा रीतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या रिक्त पदावर अशा व्यक्तीस, नामनिर्देशित करण्यात आले आहे त्या व्यक्तीने, जर असे पद रिक्त झाले नसते तर, जेवढ्या पदावधीसाठी ते पद धारण केले असते, त्या व्यक्तीच्या उर्वरित पदावधीसाठी ते पद धारण करीलः

परंतु, जर अध्यक्षाव्यतिरिक्त सदस्याचे रिक्त पद, त्या सदस्याचा पदावधी संपण्याच्या दिनांकापूर्वीच्या सहा महिन्यांच्या आत रिक्त झाले असेल तर, ते रिक्त पद भरण्यात येणार नाही.

(५) अध्यक्ष व सदस्य यांना प्रदेय असलेले मानधन, कोणतेही असल्यास, व भत्ते आणि त्यांचे पद धारण करण्याच्या अन्य अटी व शर्ती, विहित करण्यात येतील अशा असतील.

आयोगाचे अधिकारी व अन्य कर्मचारी.

**५.** (१) राज्य शासन, या अधिनियमाखालील आयोगाची कार्ये कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा संख्येतील अधिकारी व कर्मचारी आयोगाला पुरवील.

(२) आयोगाच्या प्रयोजनासाठी नियुक्त केलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, राज्य शासन, विहित करील अशा असतील.

मानधन, वेतन व भत्ते अनुदानातून प्रदान करणे.

**६.** अध्यक्ष व सदस्य यांना प्रदेय असलेले मानधन व भत्ते, आणि कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते आणि अन्य सेवासमाप्ती लाभ यांसह, प्रशासकीय खर्च, कलम १२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून प्रदान करण्यात येईल.

रिक्त पदे, इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही अविधिग्राह्य न ठरणे.

**७.** आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केवळ, आयोगामधील कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा आयोगाच्या रचनेमध्ये दोष असल्याच्या अथवा अध्यक्ष म्हणून किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नामनिर्देशनामध्ये कोणतेही दोष असल्याच्या, किंवा बैठक घेण्यासाठी नोटीस काढण्यासह आयोगाच्या कार्यपद्धतीमध्ये, प्रकरणाच्या गुणवत्तेवर परिणाम न करणारी, कोणतीही अनियमितता असल्याच्या कारणावरून अविधिग्राह्य ठरणार नाही.

आयोगाने विनियमित करावयाची कार्यपद्धती.

**८.** (१) आयोग, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, अध्यक्ष ठरवील अशा वेळी व अशा ठिकाणी बैठक घेईलः

परंतु, आयोग, तीन महिन्यांतून किमान एकदा बैठक घेईल.

(२) आयोग, त्याची स्वतःची कार्यपद्धती विनियमित करील, आणि त्यास, या प्रयोजनासाठी, या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असे विनियम करता येतील.

(३) आयोगाचे सर्व आदेश व निर्णय, सदस्य-सचिवाकडून किंवा याबाबतीत सदस्य-सचिवाने रीतसर प्राधिकृत केलेल्या आयोगाच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

## प्रकरण तीन

### आयोगाचे अधिकार व कार्ये

आयोगाचे अधिकार.

**९.** (१) आयोगास, या अधिनियमाखालील तक्रारींची चौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ या अन्वये, एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयास असलेले, पुढील बाबींच्या संबंधातील सर्व अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(क) राज्याच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठवून बोलावणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास भाग पाडणे;

(ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागविणे;

(ङ) साक्षीदारांची व दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे; आणि

(च) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

(२) जर आवश्यक असेल तर, आयोग, त्याच्या चौकशी अहवालाची एक प्रत, त्याच्या शिफारशींसह शासनाला, किंवा यथास्थिति, संबंधित प्राधिकरणाला पाठवील आणि शासन किंवा संबंधित प्राधिकरण, आयोगाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत अहवालावर केलेल्या किंवा करण्याचे प्रस्तावित केलेल्या कारवाईचा त्याचा अनुपालन अहवाल, आयोगास पाठवील.

**आयोगाची कार्ये.**

**१०.** आयोगाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :-

(क) अनुसूचित जमातींसाठी भारताच्या संविधानान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये किंवा शासनाच्या कोणत्याही आदेशान्वये तरतूद केलेल्या संरक्षक उपाययोजनांशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबींचे अन्वेषण व संनियंत्रण करणे आणि अशा संरक्षक उपाययोजनांच्या कार्यान्वयनाचे मूल्यमापन करणे ;

(ख) अनुसूचित जमातींना हक्कांपासून व संरक्षक उपाययोजनांपासून वंचित ठेवल्यासंबंधीच्या विशिष्ट तक्रारींची चौकशी करणे ;

(ग) अनुसूचित जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी होणे व सल्ला देणे आणि राज्यामधील त्यांच्या विकासाच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे ;

(घ) या संरक्षक उपाययोजनांच्या कार्यान्वयनावरील अहवाल, दरवर्षी आणि आयोगाला योग्य वाटेल अशा इतर वेळी, शासनाला सादर करणे;

(ङ) अनुसूचित जमातींचे संरक्षण, कल्याण व सामाजिक-आर्थिक विकास यांकरिता या संरक्षक उपाययोजनांची व इतर उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने हाती घ्यावयाच्या उपाययोजनांसंबंधी शिफारशी करणे;

(च) अनुसूचित जमातींचे संरक्षण, कल्याण व विकास आणि उन्नती यासंबंधातील, विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे;

(छ) अनुसूचित जमातींच्या समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर संशोधन करणे आणि यथोचित कारवाईसाठी त्याबाबत शासनाला अहवाल देणे;

(ज) अनुसूचित जमातींना बाधक ठरणाऱ्या कायद्यांच्या विद्यमान तरतुदींचे वेळोवेळी पुनर्विलोकन करणे, आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपर्याप्तता किंवा दोष दूर करण्यासाठी सुधारात्मक वैधानिक उपाययोजना सुचविण्यासंबंधी त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारस करणे;

(झ) अनुसूचित जमातींच्या बाबतीत केंद्र व राज्य शासनाद्वारे राबविण्यात असलेल्या धोरणांच्या अंमलबजावणीचे पुनर्विलोकन करणे;

(ञ) अनुसूचित जमातींच्या बाबतीत राज्य शासनाने हाती घ्यावयाच्या यथोचित कल्याणकारी उपाययोजना सुचवणेः

परंतु, जर या कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रकरणावर, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३८ अ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडून कार्यवाही केली जात असेल तर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगास, अशा प्रकरणावर अधिकारिता असल्याचे समाप्त होईल.

**शासनाने आयोगाशी विचारविनिमय करणे.**

**११.** शासन, अनुसूचित जमातींना बाधक ठरणाऱ्या प्रमुख धोरणात्मक बाबींवर आयोगाशी विचारविनिमय करील.

## प्रकरण चार

### वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

**शासनाकडून अनुदाने.**

**१२.** (१) राज्य शासन, या बाबतीत कायद्याद्वारे, राज्य विधानमंडळाने केलेल्या यथोचित विनियोजनानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी विनियोग करण्याकरिता, राज्य शासनाला योग्य वाटतील अशा रकमा, राज्याच्या एकत्रित निधीमधून अनुदानाच्या स्वरूपात आयोगाला प्रदान करील.

(२) आयोगास, या अधिनियमाखालील त्याची कार्ये पार पाडण्यासाठी, त्यास आवश्यक वाटतील अशा रकमा, खर्च करता येतील आणि अशा रकमा, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून प्रदेय असलेला खर्च असल्याचे मानण्यात येईल.

**लेखे व लेखापरीक्षा.**

**१३.** (१) आयोग, योग्य ते लेखे व इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि महालेखापालाशी विचारविनिमय करून, राज्य शासनाद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करील.

(२) महालेखापालाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालांतराने, आयोगाच्या लेख्यांची, लेखापरीक्षा करण्यात येईल, आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधात केलेला कोणताही खर्च, आयोगाकडून महालेखापालाला प्रदेय असेल.

(३) महालेखापालास आणि या अधिनियमान्वये आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात, सर्वसाधारणपणे महालेखापालाला जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार, अशा लेखापरीक्षेच्या संबंधात असतील आणि विशेषतः, त्याला, पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके , कागदपत्रे व इतर दस्तऐवज सादर करण्यास सांगण्याचा आणि आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(४) महालेखापालाने किंवा या बाबतीत त्याने यथोचितरीत्या नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने प्रमाणित केलेले आयोगाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह, आयोगाकडून दरवर्षी राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील.

**वार्षिक अहवाल.**

**१४.** आयोग, मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कार्यांचा संपूर्ण तपशील देणारा त्याचा वार्षिक अहवाल, प्रत्येक वित्तीय वर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी तयार करील आणि त्याची एक प्रत, राज्य शासनाकडे पाठवील.

**वार्षिक अहवाल व लेखापरीक्षा अहवाल राज्य विधानमंडळासमोर ठेवणे.**

**१५.** राज्य शासन, आयोगाचा वार्षिक अहवाल तसेच कलम ९ अन्वये त्याने दिलेला सल्ला किंवा केलेल्या शिफारशी यावर केलेल्या कारवाईचे ज्ञापन, दिलेला सल्ला किंवा अशा शिफारशी, कोणत्याही असल्यास, न स्वीकारण्याची कारणे, आणि लेखापरीक्षा अहवाल, ते प्राप्त झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण पाच

### संकीर्ण

**आयोगाचा अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे.**

**१६.** आयोगाचा अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी, भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या पोट-कलम (२८) च्या अर्थानुसार, लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. २०२३ चा ४५.

**सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.**

**१७.** या अधिनियमानुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार, सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत, आयोगाच्या निदेशान्वये कार्य करणाऱ्या आयोगाच्या कोणत्याही सदस्याच्या किंवा आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या विरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**विनियम करण्याचा अधिकार.**

**१८.** आयोगास, या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी, या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विनियम, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे करता येतील.

**१९.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी, आयोगाशी विचारविनिमय करून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल तर, आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केला तर, तो नियम, असा निर्णय **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये या पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**२०.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवली तर, शासनाला, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

सामाजिक न्यायाच्या धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक रामाआ-२००३/ प्र. क्र. १७५/मावक-१, दिनांक १ मार्च २००५ याद्वारे, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग घटित केला आहे.

२. आता, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींच्या हितांचे संरक्षण व रक्षण करण्याच्या आणि त्यांचे कल्याण व विकास करण्यासाठी सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करण्याच्या दृष्टीने कायदा करून, अनुसूचित जमातींसाठी एक स्वतंत्र वैधानिक आयोग घटित करणे शासनास आवश्यक वाटते.

३. वरील उद्दिष्टये साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३० जून, २०२५.

**डॉ. अशोक ऊईके,**
आदिवासी विकास मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १(२).**—या खंडान्वये, ज्या दिनांकास हा अधिनियम अंमलात येईल तो दिनांक, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३ (१).**—या खंडान्वये, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे घटित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४ (५).**—या खंडान्वये, आयोगाचा अध्यक्ष व सदस्यांना प्रदेय असलेले मानधन व भत्ते, आणि अशा अध्यक्ष आणि सदस्यांचे पद धारण करण्याच्या अटी व शर्ती, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५ (२).**—या खंडान्वये, आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १० (च).**—या खंडान्वये, अनुसूचित जमातींचे संरक्षण, कल्याण व विकास आणि उन्नती या संबंधातील आयोगाची अशी इतर कार्ये, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १३ (१).**—या खंडान्वये, आयोगाद्वारे ज्या नमुन्यात वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करण्यात येईल तो नमुना, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १४.**—या खंडान्वये, आयोगाद्वारे ज्या नमुन्यात व ज्या वेळेत वार्षिक अहवाल तयार करण्यात येईल तो नमुना व वेळ विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १८.**—या खंडान्वये, या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनियम करण्याचा अधिकार, आयोगाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १९ (१).**—या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २०.**—या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, उद्‌भवणारी कोणतीही अडचण दूर करण्यासाठी अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी करण्यासाठी **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेला आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

(शा.म.मु.) एचबी ०६६९—३ (६००-७-२०२५)

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकाच्या खंड ३(१) मध्ये, राज्यात महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग घटित करण्याची तरतूद केली आहे. आयोगात अध्यक्ष व सदस्य यांचा समावेश असेल आणि आयोगाची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकारी व कर्मचारीदेखील आयोगास पुरविण्यात येतील. अध्यक्ष व सदस्य यांना प्रदेय असलेले मानधन व भत्ते आणि अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते, इत्यादी आणि इतर प्रशासकीय खर्च, त्याबाबतीत केलेल्या यथोचित विनियोजनाद्वारे, राज्य शासनाने, आयोगाला दिलेल्या अनुदानातून प्रदान करण्यात येईल. राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून हे विधेयक अधिनियमित झाल्यावर, त्यामध्ये राज्याच्या एकत्रित निधीतून दर वर्षी करावयाच्या अंदाजे रुपये चार कोटी वीस लाख इतक्या आवर्ती खर्चाचा अंतर्भाव असेल.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ यांच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५ विचारार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानपरिषदेस शिफारस करीत आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७. ]**

**[ महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींच्या हिताचे संरक्षण व रक्षण करण्याच्या; आणि त्यांचे कल्याण व विकास करण्यासाठी सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक.]**

**[डॉ. अशोक ऊईके,**

आदिवासी विकास मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**

सचिव ( १ ),

महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.